# खराडे अ‍ॅग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: पाच || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ जून २०२४


## इंदापूर तालुक्यातील ९१ गावांमधील शेतकरी पेरू उत्पादनात अग्रेसर...



पेरू फळ

### कृषी जगतातील विशेष घडामोडी

- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने (MSEDCL) राज्यभरात ग्राहकांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच वीज गळती रोखण्यासाठी राज्यभर वीज मीटर बसविण्याची तयार सुरु केली आहे.
- आयातीबाबत आणि आयात कर शुल्क बाबत ४ जूननंतर लोकसभेचा निकाल जाहीर झाल्यानंतर निर्णय घेण्याची शक्यता आहे.
- पडीक जमिनीसह वरक व शेताच्या बांधावर फळबागेची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुदान मिळणार आहे.

**इंदापूर**: पूर्वी घरासमोर, विहिरीच्या कडेला, शेताच्या बांधावर असणाऱ्या पेरूच्या झाडांनी शेतकऱ्यांचे शेतात मोठमोठ्या बागांचे स्थान घेतले आहे. हे शक्य झाले आहे आर्थिक दृष्ट्या परवडेबल असणाऱ्या पेरू पिका मुळे!

इंदापूर तालुक्यातील तब्बल ९१ गावांमध्ये सन २०१९-२० मध्ये ३५६ हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येणारे पेरूचे उत्पादन हे २०२३-२४ मध्ये २ हजार ४४९.५ हेक्टर मध्ये विस्तारित झाले आहे.ही गोष्ट फक्त इंदापूर तालुक्याचीच नाहीतर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणची आहे.

पण महाराष्ट्राच्या कृषिजगतात होणाऱ्या या परिवर्तनात विशेष रोल-प्ले करते ती पेरू पिकाची उत्पादन क्षमता आणि त्यातून मिळणारा समाधानकारक मुनाफा! इंदापूर तालुक्याचा विचार केला तर पुणे-सोलापूर महामार्गावर असणाऱ्या तालुक्याचे स्थापत्य, त्यामुळे हात विकारीसाठी मिळणारे आयते मार्केट आणि सोबतच बाहेर गावी माल विक्रीसाठी पाठवायचा झाला तर दळणवळणाच्या असलेल्या सुविधा! **(पूर्ण वाचा- पान नं. २ वर)**




**|| पुढील पानावर ||**

- **यशोगाथा**
- **बोल अनुभवाचे**



Plot no. 251, M.I.D.C. Baramati || 9309253091 || 9209317742

# शेती व डाळींब उत्पादनातून साधली आर्थिक प्रगती!



श्री. विनोद जाधव

श्री. विनोद जाधव हे मालेगांव या अवर्षणप्रवण तालुक्यातील सातमाने गावांतील रहीवासी असून एकत्रित कुटुंबात राहतात. त्याचे सर्व कुटुंब फळपिके, भाजीपाल्याचे उत्पादन आणि रोपवाटीकेचा व्यवसाय करत असून तालुक्यात आदर्श कुटुंब म्हणून त्यांचा नावलौकीक आहे. ते स्वतः पदवीधर असून ते एका खाजगी कंपनीत नोकरी करीत होते. परंतु नोकरीचा राजीनामा देवून आधुनिक शेती करावयाचा संकल्प त्यांनी केला. वडीलोपार्जित पारंपारिक शेती पध्दती, रासायनिक खते, रासायनिक व किटकनाशके व अतिरिक्त पाण्याचा वापर यामुळे त्यांच्या शेतीचे उत्पन्न अत्यंत कमी होते. त्यामुळे कौटंबिक गरजा भागविणे सुध्दा शक्य नव्हते. शेती तोट्यात जात होती म्हणून शेतीतील परिवर्तनाचा त्यांना ध्यास लागला. महाराष्ट्रातील शेतीविषयक विविध संशोधन केंद्रांना त्यांनी भेटी दिल्या. फक्त आधुनिक शेती न करता शेतीसाठी जोड व्यवसाय म्हणून त्यांनी रोपवाटीका व्यवसाय आणि शेतीमध्ये शेडनेटचा वापर करून ढोबळी मिरची, काकडी इ. भाजीपाल्याचे उत्पादन सुरू केले. गांडुळखत, पिक फेरपालट, सापळा पिक पध्दत, फेरोमन ट्रॅप, कंपोस्ट खत, व्हर्मीवॉश, हिरवळीच्या खतांचा वापर करून मल्चींग आच्छादन, सुक्ष्म सिंचन या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सुरेख मेळ घालत शेतीतील यशाचा सुवर्णमध्य साधून सुमारे ४५ एकर क्षेत्रावर आधुनिक पद्धतीने फळपिके, भाजीपाला तसेच ५ एकर क्षेत्रावर रोपवाटीका तर १.२० हे क्षेत्रावर शेडनेट भाजीपाला उत्पन्नाचा व्यवसाय करीत आहे. प्रथम २००२ साली रोपवाटीकेच्या व्यवसायास सुरवात केली. परिसरात एकही रोपवाटीका नसल्यामुळे शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्वक रोप उपलब्ध करून देण्यासाठी रोपवाटीका व्यवसाय सुरू केला. त्यानंतर रोपे घ्यावयास येणाऱ्या शेतकऱ्यांना डाळींब, पेरू, अंजीर, आंबा, पपई अशा फळपिकांबद्दल तांत्रिक माहिती देण्यास सुरवात केली. त्याच्या या कार्याबद्दल २००६ साली सेंद्रीय रोपवाटीका प्रदर्शनात माजी कृषि मंत्री मा. बाळासाहेब थोरात यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे. २०२२ मध्ये त्यांना वसंतराव नाईक शेतिनिष्ठ पुरस्कार मिळाला. कृषि विभागाच्या शेतकरी सहल, शिवार फेरी, शेतकरी चर्चासत्र, शेतकरी प्रशिक्षण, शेतकरी अभ्यास दौरे तसेच शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या कृषि विभागाच्या सर्व प्रशिक्षण, शेतीशाळा, शास्त्रज्ञ भेटी इ. साठी कायम सहकार्य करीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

विनोद जाधव यांच्या या सातत्यपूर्ण धडपडीला व त्यांना मिळालेल्या यशाला खराडे ॲग्रोचा सलाम!

## || बोल अनुभवाचे ||

### श्री. राहुल चव्हाण, डोरलेवाडी

खराडे ॲग्रोच्या फ्रूट नेट व फोमच्या गुणवत्तेबद्दल आणि त्यांच्या सेवेबद्दल धन्यवाद! आता पर्यंत त्यांच्याकडुन आम्ही ५,००,००० हुन अधिक फोमची खरेदी केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेबद्दल मी पूर्ण संतुष्ट आहे आणि त्यांची सेवा उत्तम आहे वेळेवर फोम बॅग मिळते. आम्हाला आत्मविश्वास आहे की आम्ही भविष्यात ही नवीन आणि उत्कृष्ट उत्पादनांसाठी त्यांची प्रोडक्ट वापरत राहू.

### श्री. लक्ष्मन येलपले, अजनाळे

माझा खराडे ॲग्रोच्या फळजाळी आणि अँटी-फॉग बॅगचा अनुभव खूपच छान आहे. फळजाळी मुळे पक्षी आणि कीटकांपासून फळांना संरक्षण मिळते, ज्यामुळे फळांचे नुकसान कमी झाले आहे. यामुळे हवेची योग्य देवाण-घेवाण होते आणि फळांची गुणवत्ता सुधारते. अँटी-फॉग बॅगमुळे फळांचे ताजेपणा जास्त काळ टिकून राहतो, आणि आर्द्रतेमुळे होणारी नासधूस टळते. खराडे ॲग्रोच्या फळ जाळी आणि अँटी-फॉग बॅग आमच्या उत्पादनाची गुणवत्ता आणि विक्री वाढवली आहे!

पान नं. 1 वरून (इंदापूर तालुक्यातील 91 गावांमधील शेतकरी पेरू उत्पादनात अग्रेसर...)

या सबंध कारणांमुळे, अलीकडच्या काळात वाढणारे पेरूचे उत्पादन आणि त्यातून मालामाल होणारे शेतकरी हे नक्कीच येत्या काळात महाराष्ट्राच्या कृषी विश्वाला दिशादर्शक ठरणार आहेत! विशेष म्हणजे पेरू बागायदारांच्या या प्रवासामध्ये खराडे अग्रॉ बजावत असलेल्या महत्वपूर्ण भूमिकेमुळे, पेरू-बागा करू पाहणाऱ्या नवनवीन शेतकऱ्यांना देखील सुरक्षित भवितव्याचा मार्ग गवसला आहे.

कारण खराडे ॲग्रो म्हणजे द्यास गुणवत्तेचा विश्वास शेतकऱ्यांचा!

